# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

**CB/50/2025**

# प्रेसनोट

गुन्हे शाखा, नवी मुंबई                                                    दिनांक १७.०९.२०२५

**जबरी चोरीचा बनाव करणा-या आरोपीकडुन ५,९०,०००/- रूपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत.**
**गुन्हे शाखा कक्ष ३ पनवेलची कामगिरी.**

---

खांदेश्वर पोलीस ठाणे गु.र.नं.२४१/२०२५, बी.एन.एस.कलम ३०९(४), ३(५) मधील फिर्यादी हे सोन्याचे व्यापारी (बी.बी.बांठिया ज्वेलर्स) आहेत. त्यांचेकडे चालक म्हणून कामास असलेला शैलेश कांबळे यास त्यांनी कळंबोली येथे १,५०,०००/- रूपये रोख रक्कम व ४,४०,०००/- रूपये किंमतीचे ४३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे पनवेल येथील मुख्य शाखेत घेवून जाणेकरीता त्याचे ताब्यात दिले होते. शैलेश कांबळे हे त्यांचे स्कुटी वरून कळंबोली ते पनवेल असे खांदेश्वर पोलीस ठाणे हदिद्तील खांदा कॉलनी रेल्वे ब्रिज येथे आले असता तेथे आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यास चाकुचा धाक दाखवून वर नमुद रोख रक्कम व सोन्याचे दागिणे असे एकुण ५,९०,०००/- रूपये किंमतीचा मुददेमाल जबरी चोरी करून नेल्याचे सांगितले होते.

मा.पोलीस आयुक्त, श्री.मिलिंद भारंबे, मा.पोलीस सह.आयुक्त श्री.संजय येनपुरे, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दिपक साकोरे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ यांनी जबरी चोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध करणेकामी व घडलेले गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

गुन्हे शाखा कक्ष-३ पनवेल सदर गुन्हयाचा समांतर तपास करत असतांना, प्रथमदर्शनी सदर गुन्हयातील चालक यानेच जबरी चोरीचा बनाव केला असल्याचे दिसून येत होते. याकरीता चालक शैलेश दिलीप कांबळे, वय 38 वर्षे, रा. आवंतीका अपार्टमेंट, रूम नंबर ६०८, घाटकोपर (प.), मुंबई याने सांगितलेले घटने प्रमाणे सदर जबरी चोरीच्या पुर्ण घटनाक्रमाची पुन्हा मांडणी केली. नमुद चालक याने आरोपीतांचे सांगितलेल्या वर्णनानुसार कोणीही संशयीत इसम घटनास्थळ परिसरात वावरल्याचे आढळुन आले नाही. त्यामुळे चालक शैलेश कांबळे यास विश्वासात घेवून त्याचेकडे केलेल्या सखोल व कौशल्यपुर्ण चौकशीत त्याने सदर गुन्हा घडल्याचा बनाव केल्याची कबुली दिल्याने त्याचेकडुन गुन्ह्यातील जबरी चोरीचा संपुर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

**आरोपीताचे नांव :-**

१) शैलेश दिलीप कांबळे, वय 38 वर्षे, रा. आवंतीका अपार्टमेंट, रूम नंबर ६०८, घाटकोपर (प.), मुंबई

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ०३ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अविनाश काळदाते यांच्या नेतृत्वात सपोनि पवन नांद्रे, पोउपनि अभयसिंह शिंदे, पोहवा. रमेश शिंदे, प्रमोद राजपुत, निलेश पाटील, सागर रसाळ, इंद्रजित कानु, रूपेश पाटील, पो.ना. आजिनाथ फुंदे, विनया पाटील पो.शि. लवंकुश शिंगाडे, विक्रांत माळी, प्रसाद घरत यांनी केलेली आहे.

★★★★★★★★★★